## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- १००९/२०२३

**अपिलार्थी, श्री.अरीफ नवाज मो.मुस्तफा,**
रुम नं.००१, डुडके हाऊस, आयडीअल मार्केटच्या मागे,
कौसा, ठाणे जि.ठाणे ४०० ६१२.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महसूल अधिकारी,
तहसिलदार ठाणे यांचे कार्यालय,ठाणे महानगरंपालिका
पार्कीग प्लाझा, ज्युपीटर हॉस्पीटल जवळ, ७ वा मजला,
पाचपाखाडी, ठाणे (प.), जि.ठाणे ४०० ६०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा निवासी नायब
तहसिलदार, तहसिल कार्यालय,ठाणे, महानगरपालिका
पार्कीग प्लाझा, ज्युपीटर हॉस्पीटल जवळ, ७ वा मजला,
पाचपाखाडी, ठाणे (प.), जि.ठाणे ४०० ६०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २९.०६.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०२.११.२०२२ | -- | १४.१२.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. १७.०४.२०२३ रोजीच्या अर्जान्वये *" PIO has failed provided me the information. FAAfailed to pass an order for the First Appeal. "* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २९.०६.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी व प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). जन माहिती अधिकारी श्री.जीवन ससाणे, सहाय्यक महसूल अधिकारी, तहसिल कार्यालय, ठाणे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" Illegal Reclamation Land*

1) *Action taken on the reclamation of landon survya nos.38,39,40 in village Mumbra and Survey nos.25 (p) 68,69,70 in village: Sonkhar (Mumbra).*
2) *Total Penalties Laid on the Reclamation of land on the above Survey Numbers.*
3) *Certified copies of the Royalty Details, reports, Panchnamas, notices, replies etc. and other documents related to the reclamation of land mentioned above. "*

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान त्यांचे कार्यालय स्थलांतर झाले असल्यामुळे, अपिलार्थी यांना माहिती पुरविण्यासाठी वेळेची मागणी केली आहे. त्यांची मागणी मान्य करण्यता येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०३.०८.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २९ जून, २०२६ .

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**